# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०४ जुलै, २०१८ / आषाढ १३, १९४० ( शके )**

**(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(४) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

### कळंब (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील घोड नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१) * १२०३५१ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील घोड नदीवरील ब्रिटिशकालीन पुलाची दुरवस्था झाली असून पुलाचे संरक्षक कठडे तुटून तसेच पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडून पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याने वारंवार अपघात घडून जीवित व वित्त हानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रार करुन सुध्दा राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असून पर्यायी पुलाची व्यवस्था होईपर्यंत पुलाची दुरुस्ती तसेच स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील घोड नदीवरील ब्रिटिशकालीन पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,नाशिक यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्या वतीने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पुणे-नाशिक (रा.म.क्र.५०) राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण प्रगतीत आहे. हया भागात साखळी क्र.४२/०० ते १७७/०० या लांबीत ब्रिटीश कालीन दुरावस्था झालेल्या पुलांची तांत्रिक तपासणी करण्यात आलेली आहे. जीर्ण अवस्थेतील पुलांची दुरुस्ती व पुर्नबांधणीची अंदाजपत्रके भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी मंजूर केली असून कामे प्रगतीत आहेत. तसेच घोड नदीवरील पूलाचा संरक्षक कठडयाची दुरुस्ती करण्यात आलेली असून त्यावरील खड्डे भरुन जोड रस्तेही वाहतूकीस सुस्थितीत असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील सांगोले-महूद बु.- वेळापूर या महामार्गाच्या दुरुस्तीबाबत

**(२) * १२०४६७ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी आदेश काढून सोलापूर जिल्ह्यातील सांगोले-महूद बु.- वेळापूर राज्य मार्ग क्र.१२५ या रस्त्याचे रूपांतर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ जी मध्ये केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती न केल्याने व मंगळवेढा-पंढरपूर व सातारा-पंढरपूर या रस्त्यावरची वाहतूक उक्त रस्त्यावर वळविल्यामुळे तसेच मालवाहतुकीच्या मोठ्या ट्रकांच्या रस्त्यावरील वाहतुकीमुळे सदर रस्ता उखडून गेला असून रस्त्यावर अनेक मोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे. मंगळवेढा-पंढरपूर व सातारा-पंढरपूर या रस्त्यावरील वाहतूक वळविल्यामुळे सांगोले-महूद बु.- वेळापूर रा.म.१२५ वर सन २०१७ च्या पावसाळयात पडलेले खड्डे भरण्याची कामे पूर्ण करण्यात आलेली असून सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. सदर रस्ते दि.३.०१.२०१७ च्या अधिसुचनेव्दारे राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झालेले असल्याने केंद्रिय रस्ते,वाहतुक व महामार्ग विभागाच्या ताब्यात देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) सांगोले-महूद बु.- वेळापूर रस्त्याची दुरुस्ती करणेसाठी सा.क्र.कि.मी.८/७०० ते ११/७००, १४/२०० ते १५/२००, १६/२०० ते १९/२०० व २१/०० ते २४/०० या एकूण १०.०० कि.मी.च्या लांबीत केंद्र शासन रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने दि. २९/०३/२०१८ च्या आदेशान्वये नुतनीकरणाच्या कामास मंजूरी दिलेली आहे. सदर लांबीच्या नुतनीकरणाच्या कामाचा कार्यारंभ आदेश दि.१८/०४/२०१८ रोजी देण्यात आलेले असून काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवाजी पार्क, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा नुतनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३) * ११९६०३ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी पार्क, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा नुतनीकरणाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने २५ लाख ९२ हजार ८०० रूपयांची जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याआधीच परस्पर मर्जीतील कंत्राटदाराला सदर काम दिल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याआधीच परस्पर मर्जीतील कंत्राटदाराला काम देऊन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

शिवाजी पार्क, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा नुतनीकरणाच्या कामाकरिता रु.९.९४ लक्ष किमतीची निविदा सूचना दिनांक १७.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यांत आली होती.

(२) निविदा सुचनेमधील वेळापत्रकानुसार निविदा उघडण्याचा दिनांक १३.०४.२०१८ असा असल्यामुळे, या कामासाठी निविदा प्रक्रीया पूर्ण होण्याकरिता लागणारा कालावधी विचारात घेता, दिनांक १ मे, २०१८ रोजीच्या महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमापूर्वी सदर कामे पूर्ण करणे शक्य नसल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन दरम्यानच्या कालावधीत सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निवडक कंत्राटदाराकडून निविदा मागवून प्राप्त झालेल्या स्पर्धात्मक देकाराच्या आधारे दिनांक ०५.०४.२०१८ रोजी सदर कामाकरिता कार्यारंभ आदेश देण्यांत आला आहे.

(३) अधीक्षक अभियंता, सा.बां. दक्षता पथक मंडळ, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यांत आली आहे.
(४) व (५) चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवर पूल बांधण्याबाबत

**(४) * १२१३३९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवर पूल बांधण्याबाबत अनेक वर्षापासून मागणी करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न केल्याने येथील बागंवाडी, खांडेवाडी, कदमवाडी व बौध्दवाडी या ४ वाडयांमधील ग्रामस्थांनी दिनांक १४ मे, २०१८ रोजीपासून गावातील डोळीचा मांडावर लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अर्जुना नदीपलीकडे असलेल्या सदर वाडयांमध्ये जाण्यासाठी पक्का रस्ताही नसल्याने येथील जनतेला अनेक अडचणीचा सामना करावा लागत असून रस्त्याअभावी उपचारासाठी दवाखान्यात वेळेवर पोहोचता न आल्याने अनेक नागरिकांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार रायपाटण येथे अर्जुना नदीवर पूल बांधण्याबाबत तसेच पुलासोबत बागंवाडी, खांडेवाडी, कदमवाडी व बौध्दवाडी या गावातील नागरिकांसाठी पक्का रस्ता बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) या पुलाचा प्रस्ताव शासनाने नाबार्डकडे मंजूरीसाठी पाठविला आहे.

-----------------

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गतचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबात

**(५) * ११८०९४ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नैसर्गिक, अपघाती मृत्यू व अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांसाठी राज्य शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतंर्गत सन २०१६ पासून दाखल केलेल्या ३ हजार ४०० प्रस्तावातून केवळ ९३२ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून यातील अनेक प्रस्ताव नाकारण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यात सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये विमा कंपनीकडे पाठविण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या एकूण ६१ प्रस्तांवापैकी केवळ १८ प्रस्ताव मंजूर करण्यात आल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे निकष अत्यंत किचकट असून संबंधित विमा कंपनी शेतकऱ्यांचे प्रस्ताव जाणिवपुर्वक प्रलंबित ठेवत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे हे काय,

(४) असल्यास, सदर योजनेंतर्गत सन २०१६ पासून राज्यातील किती शेतकरी कुटुंबांनी प्रस्ताव दाखल केले असून त्यातील किती प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे व किती प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित आहेत तसेच नाकारण्यात आलेले प्रस्ताव किती आहेत,

(५) असल्यास, या योजनेतील प्रलंबित प्रस्ताव तातडीने मंजुर करण्यासह प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत ७/१२ धारक शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास, अथवा अपंगत्व आल्यास, विमा रक्कम देय ठरते. यामध्ये नैसर्गिक मृत्यूचा समावेश नाही. राज्यात या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये माहे १८ जून, २०१८ अखेरच्या अहवालानुसार एकूण ३३८७ शेतकऱ्यांनी विमा प्रस्ताव कृषि विभागाकडे दाखल केले आहेत. त्यापैकी २५३३ प्रस्ताव ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीकडे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी १३८१ प्रस्ताव मंजूर झाले असून, ३८३ प्रस्ताव अटी व शर्तीत बसत नसल्याने नाकारण्यात आले आहेत. ७६९ प्रस्ताव अद्यापही विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत. ८५४ प्रस्तावांमध्ये कागपत्रांच्या त्रुटी असून त्यांची पूर्तता वारसदारांकडून क्षेत्रियस्तरावरुन करुन घेण्यात येत आहे.

(२) भंडारा जिल्ह्यातील सन २०१६-१७ या वर्षातील एकूण ५८ प्रस्ताव प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ४६ प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी २० प्रस्ताव मंजूर झाले असून ९ प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. १७ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत. १२ प्रस्तावांतील कागदपत्रांची पूर्तता वारसदारांकडून क्षेत्रीय स्तरावरुन करुन घेण्यात येत आहे.

सन २०१७-१८ मध्ये भंडारा जिल्ह्यातून आतापर्यंत एकच प्रस्ताव प्राप्त झाला असून तो विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये माहे मे, २०१८ अखेरच्या अहवालानुसार एकूण ३३८७ शेतकऱ्यांनी विमा प्रस्ताव कृषि विभागाकडे दाखल केले आहेत. त्यापैकी २५३३ प्रस्ताव ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीकडे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यापैकी १३८१ प्रस्ताव मंजूर झाले असून ३८३ प्रस्ताव अटी व शर्तीत बसत नसल्याने, नाकारण्यात आले

आहेत. ७६९ प्रस्ताव अद्यापही विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत. ८५४ प्रस्तावांमध्ये कागपत्रांच्या त्रुटी असून त्यांची पूर्तता वारसदारांकडून तालुका स्तरावरुन करुन घेण्यात येत आहे.

सन २०१७-१८ मधील आतापर्यंत राज्यात एकूण ३४४ प्रस्ताव कृषि विभागाकडे प्राप्त झाले असून त्यापैकी १९९ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी ७ प्रस्ताव मंजूर झाले असून ३ प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. १८९ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत तर १४५ प्रस्तावांतील त्रुटींची पूर्तता क्षेत्रिय स्तरावरुन करुन घेण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी शेतकऱ्यांनी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला मोर्चा

**(६) * ११७३५६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासीं कसत असलेली वन जमीन, गायरान जमीन त्वरित आदिवासींच्या नावावर करण्यात यावी, मनरेगा अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावरील कामाचा समावेश रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात यावा, विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांना राज्य सहकारी बँकेने थेट कर्जपुरवठा करावा इत्यादी मागण्याकरिता नाशिक येथील आदिवासी बांधवांनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी नाशिक यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या संदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०१८ मध्ये मंत्रालयावर महामोर्चा काढला असता सर्व मागण्या शासनाने मान्य केल्याचे दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास घोषित करुनही त्यांची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णू सवरा :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन प्रलंबित वन हक्क दावे व अपिले यांचा निपटारा करण्यासाठी आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. वहका-२०१८/प्र.क्र.४३/का.१४, दि.११ मे, २०१८ अन्वये विशेष "वनमित्र मोहिम" राबविण्यात येत आहे. सदर कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांनी मोहिम स्वरुपात वन हक्कांचे निर्णय घेण्याबाबत आवश्यक ते नियोजन करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. प्रस्तुत वनमित्र मोहिमेच्या प्रगतीबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय आढावा घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अवैध खासगी ऑटोरिक्षांवर कारवाई करण्याबाबत

**(७) * ११९८९५ श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर),**

**श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४ लाख अवैध खासगी ऑटोरिक्षांना त्यांच्या परवान्यावर नोंदणी करुन वैधता मिळविण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजीपर्यंत मुदत देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुदतीपर्यत फक्त २१० खासगी ऑटोरिक्षांनी परवान्यावर नोंदणी केली असून नोंदणी न केलेल्या उर्वरित ऑटोरिक्षांवर जप्तीच्या कारवाईचे आदेश मा.परिवहन मंत्री यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयांना दिले असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशानुसार किती अवैध खासगी ऑटोरिक्षांवर शासनाने कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी संवर्गात नोंदणी झालेल्या ऑटोरिक्षांची संख्या १.३७ लक्ष आहे. अशा रिक्षा चालकांना परवान्यावर नोंदणी करून घेण्यासाठी दि.२२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

(२) हे खरे आहे.

दि.१८.०६.२०१८ पर्यंत खाजगी संवर्गातून परिवहन संवर्गात परवान्यावर नोंदविण्यात करण्यात आलेल्या ऑटोरिक्षांची संख्या ही २५५ इतकी आहे.

(३) खाजगी सवंर्गात नोंदणी असलेल्या अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ऑटोरिक्षांची विशेष तपासणी मोहीम राज्यामध्ये दि.१६.०४.२०१८ पासून राबविण्यात आली. सदर मोहीमेअंतर्गत दिनांक २०.०६.२०१८ पर्यत एकूण २१६१ खाजगी ऑटोरिक्षा अवैधरित्या वाहतूक करताना आढळून आल्या असून सदर कार्यवाहीतून रू.३६,५९,७७५/- इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कारंजा रमजानपूर (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील पाणखास नदी पात्रातील अवैध वाळू उत्खननाबाबत

**(८) * १२२३६९ श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कारंजा रमजानपूर (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील पाणखास नदीवर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने चार वर्षापूर्वी सुरू केलेल्या धरणाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने नदीपात्रातून अवैधरीत्या वाळू उत्खनन करून ४५१७ ब्रास वाळू जमा केल्याबाबतच्या मंडळ अधिकारी यांच्या अहवालानंतर तहसीलदार, बाळापुर यांनी याबाबत चौकशी समिती नेमली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसिलदार, बाळापूर यांनी सदर प्रकरणाच्या तपासाकरीता नेमलेल्या पंचायत समितीच्या तांत्रिक अभियंता व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अभियंत्यांच्या समितीने केलेल्या चौकशीमध्ये २०८० ब्रास वाळू जमा करून शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीच्या निष्कर्षाप्रमाणे संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे कारंजा रमजानपूर (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील पाणखास नदीवर सुरु असलेल्या धरणाच्या कामाकरीता धरणाचे कंत्राटदार यांनी पाणखास नदीमध्ये रेतीचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी मंडळ अधिकारी, हातरुण यांनी दिलेल्या अहवालानुसार तहसीलदार, बाळापूर यांनी कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२, अकोला यांना चौकशी करुन अहवाल देण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या तपासणीमध्ये २०८०

ब्रास वाळूचे उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर धरणाच्या कंत्राटदाराविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम,१९६६ च्या तरतुदीनुसार कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर येथील मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रात**
**झालेला गैरव्यवहार**

**(९) * ११८२३१ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शासनाच्या शासकीय विश्रामगृहाच्या शेजारी असलेल्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रात अंडी व पिल्ले विक्रीत वर्षाला सुमारे सात लाखांहून अधिक रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, कोल्हापूर येथील प्रक्षेत्राच्या कामकाजाबाबत दि.१५.०३.२०१८ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) होय.

सदर प्रकरणी उपआयुक्त पशुसंवर्धन (कुक्कुट), रोग अन्वेषण विभाग, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निपाणी-फोंडा (जि.कोल्हापूर) या राज्यमार्गावरील निढोरी येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) * ११८६७० श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निपाणी-फोंडा (जि.कोल्हापूर) या राज्यमार्गावरील मुरगूड जवळ असलेल्या निढोरी येथील १०० वर्षापूर्वीच्या पुलाची दुरवस्था झाली असून देखभाल व दुरुस्तीअभावी पुलाच्या भिंतीला भेगा पडल्याने तसेच भरावाच्या संरक्षक भिंतीला दोन्ही बाजूने तडे गेल्याने पुल अत्यंत कमकुवत झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलावरुन मोठया प्रमाणात अवजड वाहतूक होत असल्याने पूल कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार निढोरी येथील पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत अथवा नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित पुल देवगड राधानगरी मुदाळतिट्टा निढोरी कापशी निपाणी राज्यमार्ग १७८ वर आहे.

सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले असून स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालातील नमूद सुचनांनुसार पुलाच्या विंग वॉलला ज्या भागात लहान प्रमाणात तडे पडले आहेत त्याची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार पुल भक्कम स्थितीत असून पुलास कोणताही धोका नाही. पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे अवैध राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ कार्यरत असल्याबाबत

**(११) * ११७४३५ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ या नावाने अनधिकृतपणे कृषी विद्यापीठ कार्यरत असून या कृषी विद्यापीठाकडून सहा जिल्ह्यांमध्ये ६३ महाविद्यालये चालविली जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठ आणि संलग्न ६३ महाविद्यालये अवैधरित्या चालविण्यात येत असल्याचे महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेने केलेल्या तपासणीत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृषी विद्यापिठाच्या चौकशीसाठी चार पथके तयार केली असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापिठाच्या कुलगुरुवर फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाचा पोलीस पथकाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे काय व त्यानुसार शासनाने सदर अवैध विद्यापिठावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) कृषि परिषद, पुणे कार्यालयाकडे प्राप्त तक्रारीच्या आधारे अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे राष्ट्रीय मागासवर्गीय कृषि विद्यापीठ, सोलापूर या नावाने अनधिकृत बोगस विद्यापीठ असून या विद्यापीठांतर्गत महाराष्ट्रातील चौदा जिल्हयात एकुण ६२ कृषि पदविका/कृषि पदवी महाविद्यालये अनधिकृतपणे सुरु असल्याचे दिसून येत आहे.
(३) व (४) महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील कलम ५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिसूचित केले आहे. त्यानुसार संचालक (शिक्षण), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून कृषि विद्यापीठ अथवा कृषि परिषदेने मान्यता प्रदान न केलेल्या कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील अनधिकृत संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी चारही कृषि विद्यापीठांचे अधिष्ठाता (कृषि) यांना प्राधिकृत केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजनाथ (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे अवैधरित्या वाळू उपसा केल्याबाबत

**(१२) * ११८९१० डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैजनाथ (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील वाळू ठेकेदारांनी वाळू ठेक्याच्या अटी व शर्तीचा भंग करून वाळूगटाच्या सिमांकनाच्या बाहेर वाळू उपसा

केल्याची लेखी तक्रार तेथील ग्रामस्थांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये तहसिलदार, जळगांव व जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाळू उपशामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले असून पर्यावरणाला हानी पोहोचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वैजनाथ येथे अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या संबंधित वाळू ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) अशा प्रकारची तक्रार दि.१०/०१/२०१८ रोजी सावरखेडा, ता.जळगांव येथील ग्रामस्थांनी केली आहे.

(२), (३) व (४) मौजे वैजनाथ, ता.एरंडोल येथील वाळूगट क्र.१११ ते ११३ च्या लिलावधारकाने अटी व शर्तीचा भंग तसेच त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या सीमांकनाच्या बाहेर उत्खनन करुन २६१.७४ ब्रास अवैध वाळू उचल केल्याचे निदर्शनास आल्याने लिलावधारकाचा ठेका रद्द करुन अनामत रक्कम रु.१४,३१,३२६/-, बँक गॅरंटी रक्कम रु.३,८०,२००/- जप्त करण्यात आली आहे. तसेच रु.५०,४७,३९२/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरडू कुसुंबळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील अवैध वाळू उपशामुळे भातशेतीला धोका निर्माण झाल्याबाबत

**(१३) * ११८९६७ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरडू कुसुंबळे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे यांत्रिक पद्धतीने अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्यामुळे धरमतर खाडी किनाऱ्यावरील हजारो एकर भातशेतीला धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महसूल विभागातील अधिका-यांकडे तक्रार करूनही येथील वाळू माफियांवर कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कुरडू कुसुंबळे येथे अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांवर व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) दि.३०/५/२०१८ रोजी मंडळ अधिकारी, पोयनाड, तलाठी, शहाबाज व पोलीस विभागामार्फत केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये पेण-अलिबाग रोड, धरमतर खाडी, शहाबाज-धरमतर पुलाच्या दक्षिण बाजूस ३८ ब्रास अवैध वाळूसाठा जप्त करण्यात येऊन पोयनाड पोलीस ठाणे येथे २५ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आंबा नदी-धरमतर खाडीमध्ये होणारे रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तहसीलदार, अलिबाग यांच्या अधिनस्थ तपासणी पथकाने माहे जानेवारी,२०१८ ते मे,२०१८ अखेरपर्यंत केलेल्या कार्यवाहीमध्ये अवैध वाळू वाहतूकीच्या ८ प्रकरणात दंडात्मक कारवाई करुन रु.२,९१,४५०/- इतकी रक्कम वसूल केली आहे. तसेच जप्त वाळू साठ्याचा लिलाव करुन रु.४,५०,१९०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला हमी भाव मिळण्याबाबत

**(१४) * ११६७१४ श्री.नारायण पाटील (करमाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राहूल कुल**

**(दौंड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला वाढीव दर मिळण्यासाठी तसेच सहकरी संघ व खासगी संस्थांनी निश्चित केलेले दर द्यावेत या मागणीसाठी फुकट दुध वाटप करणे, रस्त्यावर दुध ओतणे व दुधाने आंघोळ करणे इत्यादी स्वरुपाचे आंदोलने माहे एप्रिल व मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दुध उत्पादक शेकतऱ्यांनी अनेक ठिकाणी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुध खरेदीच्या दरात ३ रुपयांनी वाढ करीत गाईच्या दुधाचा दर रुपये २४ वरून रुपये २७ पर्यंत तर म्हशीच्या दुधाचा दर रुपये ३३ वरून ३६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असतानाही खाजगी व सहकारी संघाकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना सदर दर न देता १८ ते २० रुपये दर दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात रोज किमान ४० लाख लिटर दूध अतिरिक्त होत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असून दुध उत्पादक शेतकऱ्यांना या अडचणीच्या परिस्थितीमधून बाहेर काढण्यासाठी व दुग्ध व्यवसाय टिकविण्यासाठी राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५ रुपये व दुध भुकटी उत्पादकांना प्रतिलिटर ३ रुपये अनुदान देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला हमी भाव मिळण्यासाठी कायदा करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दुध उत्पादक शेतकऱ्यांकडून होत असलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने दुधाला हमीभाव देण्याबाबत तसेच दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) सन २०१६-१७ मधील दूधाच्या पुष्टकाळाच्या तुलनेत चालू वर्षाच्या दूधाच्या पुष्टकाळात सरासरी १६ ते २२ लक्ष लिटर इतकी वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

या अतिरिक्त दूध उत्पादन कालावधीत सहकारी दूध संघ, दूध भुकटी प्रकल्पधारक व शेतकरी दूध उत्पादक संघर्ष समिती यांनी विविध निवेदनाद्वारे अनुदान देण्याबाबतची मागणी केली आहे हे खरे आहे.

(४) होय.

(५) जीवनाश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये जीवनाश्यक वस्तुंकरिता किमान आधारभूत निश्चित करण्याचे केंद्र शासनास आहेत. त्यामूळे दूधाकरिता किमान आधारभूत किमंत निश्चित व्हावी त्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट,२०१५ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाकडून केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. यासंदर्भातील केंद्र शासनाचा निर्णय प्रतिक्षाधिन आहे. असे असले तरी, केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रतिक्षा न करता, दूध उत्पादक शेतक-यांना दूधासाठी हमी भाव मिळावा म्हणून Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act-२०१३ च्या धर्तीवर दूधाकरिता कायदा करण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कणकवली-आचरा (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) * १२२१५८ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण व कणकवली (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यांना जोडणाऱ्या कणकवली आचरा या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावरील डांबर उखडल्यामुळे तसेच खड्डे पडल्यामुळे प्रवाशी व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकारण करण्याबाबत आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांनी मागील तीन वर्षांपासून सातत्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, उपविभाग कणकवली, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, मा.पालकमंत्री सिंधुदुर्ग, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री इत्यादीकडे निवेदने सादर करून तसेच आंदोलने करून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरण्याच्या कामासाठी शासनाने मंजुरी दिली असून सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात २ कोटी ८१ लाखाची आर्थिक तरतुद केली असतानाही सदरहू कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर रस्त्याच्या कामास तातडीने सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित आचरा-कणकवली रस्ता रा.मा.१८१ च्या कि.मी. ००/०० ते कि.मी. ५०/३२० मध्ये सुधारणा करणे हे काम ॲन्युईटी अंतर्गत रु.१५९.०० कोटी रक्कमेस मंजूरी असून या कामाकरीता दोन वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तथापि त्यास मक्तेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

तसेच आचरा(बंदर) वरवडे कणकवली हरकुळ फोंडा उंबर्डे मार्ग रस्ता रा.मा. १८१ कि.मी. ३१/४०० ते कि.मी. ३६/८०० या कामास विशेष दुरुस्ती कार्यक्रमांमधून रु.२५०.०० लक्ष एवढया किंमतीस मान्यता मिळाली असून कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. विधानपरिषद आचारसंहितेमुळे निविदा कार्यवाही पूर्ण न झाल्याने कामास सुरुवात झालेली नाही. आचारसंहिता संपताच कामाचे कार्यारंभ आदेश देऊन कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे, डांबर मिश्रित खडीने भरण्यात आले आहेत. रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर-बार्शी-कुर्डूवाडी-टेंभुर्णी या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१६) * १२१३५७ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर-बार्शी-कुर्डूवाडी-टेंभुर्णी हा लातूर, बीड, नांदेड, उस्मानाबद या जिल्ह्यातील नागरिकांना पुणे व मुंबई येथे जाण्यासाठी अत्यंत जवळचा, महत्वाचा व वर्दळीचा रस्ता असून सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने व रस्ता अरुंद असल्याने वाहतुकीस विलंब लागून रस्त्यावर अनेक अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या त्रीपदरीकरणाच्या कामास मंजुरी मिळाली असून या कामाची निविदा प्रक्रिया चालू असल्याचे मा.पालकमंत्री, लातूर यांनी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निदर्शनास आणले तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनीही रस्त्याचे दुरुस्तीचे काम माहे मे महिन्याच्या शेवटी पूर्ण करून रस्ता राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचे आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे काय तसेच त्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, याबबत चौकशी करून रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करुन रस्ता राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) प्रश्नाधीन रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामास प्राप्त झालेल्या मंजूरीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून रस्त्याच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

(४) रस्त्याच्या दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर असून पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोले ते बारी (ता.अकोले, जिअहमदनगर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) * ११९८९९ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले ते बारी (रामा ५०) (ता.अकोले, जि.अहमदनगर) या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने रस्ता वाहतुकीसाठी गैरसोयीचा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त करावा अशी मागणी स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार अकोले ते बारी या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

(२), (३) व (४) होय. हे खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्यावरील जिल्हा हद्द बारी राजूर रस्ता (रामा-२३) किमी २०५/३८० ते २३३/८८० व राजूर अकोले संगमनेर रस्ता (रामा-५०) किमी ५०/२०० ते ८९/३०० या लांबीतील खड्डे भरण्याचे काम वार्षिक देखभाल-दुरूस्ती कार्यक्रमांतर्गत करण्यात आले होते व रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला होता. तथापी, तद्नंतर अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर खड्डे पडले. या लांबीतील रस्ता दुरूस्तीचे काम मंजूर करण्यात आले असून निविदा निश्चिती करून काम सुरू करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवराखंड (जि.बुलढाणा) येथील पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१८) * १२०५७८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवराखंड (जि.बुलढाणा) येथील पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे बाधित शेतकऱ्यांनी याबाबत संबधित अधिका-यांकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार हिवराखंड येथील पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला तातडीने शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, यासंदर्भाने चौकशी केलेली आहे.

(३) मौ. हिवराखंड, ता.लोणार, जि.बुलडाणा येथील पाझर तलाव क्र. ०१ व क्र.०२ या तलावांकरिता संपादित केलेल्या जमिनीच्या प्रकरणी भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मेहकर यांच्या मागणीप्रमाणे उपाधिक्षक भूमि अभिलेख, लोणार यांच्याकडून संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त करून घेण्यात आलेला असून सरळ खरेदी प्रकरण तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-रत्नागिरी महामार्गासाठी संपादित जमिनींचा योग्य मोबदला देण्याबाबत

**(१९) * ११९०६९ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-रत्नागिरी महामार्गासाठी जमिनी संपादित करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिल्याशिवाय कामाला सुरुवात होऊ देणार नसल्याचा इशारा लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर कार्यालयाला माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांबवडे, ठमकेवाडी व डोणोली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथून जाणाऱ्या कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गासाठी कोणत्याही प्रकारची सुचना अथवा नोटीस न देता जबरदस्तीने भुसंपादनाची कारवाई केली जात असल्याने यास शेतकरी व रहिवाशांनी विरोध करून त्याबाबतचे लेखी निवेदन शाहूवाडी तहसिलदार यांना दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गासाठी मौजे वडगांव (जि.कोल्हापूर) येथील शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध करून अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना त्याबाबतचे निवेदन दिले आहे तसेच पन्हाळा व हातकणंगले तालुक्यातील शेतक-यांच्या किती जमिनी या महामार्गासाठी संपादित करण्यात येणार आहे व शेतकऱ्यांना कोणत्या दराने या जमिनींचा मोबदला मिळणार आहे,

(४) असल्यास, या महामार्गासाठी औसा (जि.लातूर) तालुक्यातील जमिनीसाठी लाभार्थ्यांना मुद्रांक शुल्क विभागाच्या कोष्टक २९ (ब) ऐवजी १६ (अ) नुसार तातडीने संपादित जमिनीचा मोबदला देण्याचे निर्देश मा.महसूल मंत्री यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी, लातूर यांना दिले असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून नागपूर-रत्नागिरी महामार्गासाठी कोल्हापूर जिल्हयातील संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत व बांबवडे, ठमकेवाडी व डोणोली येथे जबरदस्तीने भूसंपादन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच वडगांव येथील जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी योग्य निर्णय घेऊन औसा तालुक्यातील जमिनीचा मोबदला मुद्रांक शुल्क विभागाच्या कोष्टक २९ (ब) ऐवजी १६ (अ) नुसार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापी, याबाबत दि.१७.०४.२०१८ रोजी तहसिलदार, शाहूवाडी व पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पोलीस स्टेशन व राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्यात आली.

(३) होय, हे खरे आहे.

पन्हाळा तालुक्यातील १० गावातील सुमारे ४५.९९ हे.आर, शाहूवाडी तालुक्यातील २५ गांवातील सुमारे १८९.२६ हे.आर. व हातकणंगले तालुक्यातील ६ गावातील सुमारे ७३.४८ हे.आर. इतके क्षेत्र संपादीत करण्यात येणार आहे. नवीन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना दिला जाणार आहे.

(४) हे खरे नाही.

(५) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या तरतूदी प्रमाणे भूसंपादन केले जात असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) दुग्धशाळा येथील चतुर्थ श्रेणी कामगार वसाहतीमधील इमारत दुरुस्ती कामात झालेला गैरव्यवहार

**(२०) * ११७५९२ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) दुग्धशाळा येथील चतुर्थ श्रेणी कामगार वसाहतीत करण्यात आलेल्या इमारत दुरुस्ती कामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषी शासकीय अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत तपासणी करण्यात येत असून तपासणी अहवालानुसार कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.

-----------------

## मौजे पारनेर व औदाणे (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांचे कांदा पीकाचे झालेले नुकसान

**(२१) * ११९०३४ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पारनेर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांनी एका कृषी कंपनीकडून कांदा बियाणे वाण खरेदी करुन पेरणी केली असता कांदा पिकाला डेंगळे आल्याने उत्पादनात घट होऊन लाखो रुपयांचे नुकसान झाल्याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी, मालेगाव यांच्याकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान शेतकऱ्यांनी लेखी तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच औदाणे (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे लागवड केलेला उन्हाळी कांदा पाण्याअभावी करपल्याने येथील शेतकऱ्यांनी शेतातील कांदयावर ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटर फिरवत पीक सोडून दिल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे कांदा बियाणे विक्री करणाऱ्या संबंधित कंपनीवर कारवाई करण्यासह मौजे पारनेर व औदाणे येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसाई भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे पारनेर, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक येथील शेतकरी श्री.जालिंदर देवरे यांनी इंडो अमेरीकन हायब्रीड सिड्स या कंपनीच्या कांदा बियाणाच्या मार्शल वाणाची लागवड रब्बी हंगाम,२०१७ मध्ये केलेली होती. कांदा रोपे पुनर्लागवड केल्यानंतर ८० टक्के पिकावर डेंगळे निघाल्याबाबतचा तक्रार अर्ज पंचायत समिती तालुका बागलाण यांच्याकडे दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी संबंधित शेतकऱ्याने केला.

(२) औदाणे (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) तक्रारदार शेतकऱ्याच्या तक्रारीची दखल घेवून तालुका तक्रार निवारण समितीने दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी प्रक्षेत्रास भेट दिली. कांदा पिकाची

अनुवंशीकता, खुरपणी करताना कांद्याला इजा होणे, पाण्याचा ताण पडणे, नत्राची मोठ्या प्रमाणावर मात्रा देणे, रात्रीचे अचानक तापमान कमी होणे, इत्यादी बाबींमुळे डेंगळे आल्यामुळे कांदा पोसला नसून शेतकऱ्याचे ५५ ते ६० टक्के नुकसान होण्याची शक्यता असल्याचा निष्कर्ष तालुका तक्रार निवारण समितीने दिलेला आहे. या संदर्भात शेतकऱ्याने जिल्हा ग्राहक मंच नाशिक येथे एप्रिल, २०१८ मध्ये नुकसान भरपाई मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथे लावण्यात येणाऱ्या सुरूंगांमुळे घरांना तडे गेल्याबाबत

**(२२) * ११६७२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथे सागरी महामार्गाच्या कामासाठी लावण्यात येत असलेल्या सुरूंगांमुळे बाणकोट किल्ला परिसरातील अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले असून या सुरुंगाच्या स्फोटांमुळे नागरिकांच्या मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांचेकडे तक्रार करूनही संबंधीतांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे संगणमत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठेकेदार तसेच संबंधीत अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच ग्रामस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

कठीण दगड फोडण्याकरीता लावलेल्या सुरुंगामुळे काही घरांना कमी प्रमाणात व छोटया स्वरुपाचे तडे गेले आहेत. मोठया प्रमाणात नुकसान झालेले नाही.

(२) व (३) स्थानिकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी, दापोली यांचेमार्फत सुनावणीची कार्यवाही चालू आहे.

(४) व (५) सुनावणी/चौकशी पूर्ण झाल्यानंतर नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## गुलाबी बोंडअळी बाधित कापसामुळे त्वचा विकाराची लागण झाल्याबाबत

**(२३) * ११७१४७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भ, मराठवाडा, नाशिक व जळगांव येथील कापसाच्या पिकावर पडलेल्या गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांनी घरात साठा करुन ठेवलेल्या कापसाच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना मोठया प्रमाणात त्वचाविकाराची लागण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोंड अळीच्या प्रादुर्भावाने उद्भवलेल्या त्वचा रोगावर उपचार करुन हा रोग आटोक्यात आणण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

घरात साठविलेल्या कापसाच्या संपर्कात आल्यामुळे रूग्णांना खाज येणे, लालसर रंगाचे पुरळ येणे इत्यादी त्रास झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, असे जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती यांनी आपल्या दिनांक ९ मार्च, २०१८ च्या अहवालात नमूद केलेले आहे. शेतामध्ये ताजा कापूस वेचणीस जाणाऱ्या शेतकरी व मजूरांमध्ये हा त्रास आढळून आलेला नाही. या संदर्भात त्रास झालेल्या रूग्णांवर औषधोपचार करण्यात आला असून अशा प्रकारचा त्रास झाल्यास घ्यावयाची प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबतची माहिती शासकीय रूग्णालयांकडून देण्यात आलेली आहे. तसेच, शेतकऱ्यास व कापूस वेचणी करणाऱ्या शेतमजूरांना याप्रकारची लक्षणे आढळल्यास त्वरीत नजीकच्या सरकारी रूग्णालयात जावून उपचार घेण्यासंबंधी व राहत्या घरामध्ये कापसाची साठवणूक न करण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा लोणबेहळ ते शेलु (ता.आर्णी, जि.यवतमाळ) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत

**(२४) * ११९३३४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा लोणबेहळ ते शेलु (ता.आर्णी, जि.यवतमाळ) या रस्त्याचे डांबरीकरण व साईडपट्ट्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, यवतमाळ, तहसिलदार, आर्णी व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) होय, सदर कामाची राज्य गुणवत्ता नियंत्रक यांच्यामार्फत दिनांक १३.४.२०१८ व दिनांक ८.६.२०१८ रोजी तपासणी करण्यात आली आहे.

सदर कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचा निष्कर्ष आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर लावलेला 'वने' शेरा कमी करण्याबाबत

**(२५) * ११७१७१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र खासगी वन संपादन अधिनियम लागू करण्यात आला होता या अधिनियमाप्रमाणे जमीन संपादन न करता जवळपास ४७ हजार ४३२ शेतकऱ्यांच्या ९८ हजार हेक्टर खासगी जमिनीवर गत २२ वर्षापासून वने असा शेरा लावला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा बेकायदेशीर शेरा काढण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी निवेदन दिले असून उच्च न्यायालयानेही राज्य शासनाला या प्रकरणी तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याचे आदेश दिनांक ३० जानेवारी, २०१४ व दिनांक ०५ मे, २०१६ रोजी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या शेऱ्यामुळे शेतक-यांना या जमिनी वापरता येत नसून त्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार शेतक-यांच्या जमीनी बेकायदेशिररित्या ताब्यात ठेवणा-या दोषी वन अधिकाऱ्यांविरुद्ध

कारवाई करून शेतकऱ्यांच्या जमिनीवरील वने शेरा कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मधील कलम २ (सी-आय) व २ (एफ) नुसार व्याखेत बसणारे सर्व खाजगी क्षेत्र सदर अधिनियमाच्या कलम - ३ प्रमाणे आपोआप शासन विहित होऊन त्यास “मानीव राखीव वन” असा वैधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. अशा क्षेत्राचा ताबा घेतला असो वा नसो ते क्षेत्र दिनांक ३०.०८.१९७५ पासून शासन विहित झाले आहे.

महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ या अधिनियमाप्रमाणे ३३३१ प्रकरणांमध्ये ८५८६५.६०९ हे.आर एवढे क्षेत्र अंतिमत: शासन विहीत झालेले आहे.

(२) खाजगी वने संपादनासंबंधी वेळोवेळी मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालय यांनी विविध निर्णय/आदेश दिलेले आहे. या विविध निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने गोदरेज अँड बॉईस लि. विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणामध्ये दिनांक ३०.०१.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कलम ३५ (३) अंतर्गत दिलेल्या नोटिस या जिवंत वा मृत ठरविण्यासाठी cutoff date चा प्रस्ताव पूर्व मंजुरीसाठी केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. त्यावर राज्य शासनाकडून पाठपुरावा सुरु आहे.

(३) महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ कायद्याच्या कलम २२-अ अन्वये पुन:स्थापित (मुळ मालकांना परत केलेले) क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये “वन” अशा नोंदी केलेल्या आहेत. पुनःस्थापित क्षेत्राचे संबंधित मालकास वन व वनउपजाचे उपभोग घेण्यास कोणतेही बंधन नाही, परंतु प्रस्तुत जागेचे वनेत्तर वापरासाठी वन (संवर्धन) कायदा, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची परवानगी आवश्यक ठरते.

(४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या आदेशानंतर केंद्र शासनाकडे महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ अंतर्गत संपादीत क्षेत्राबाबत, दि.२०.०६.२०१७ व दि.२२.०७.२०१७ रोजी बैठकी घेण्यात आल्या होत्या त्या बैठकीत हे स्पष्ट करण्यात आले होते कि,

महाराष्ट्र खाजगी वनें (संपादन) अधिनियम १९७५ अंतर्गत च्या कलम ६ अंतर्गत मुक्त किंवा कलम-२२अ अंतर्गत पुनःस्थापित क्षेत्राचे खरेदी विक्री करण्याबाबत वन (सवंर्धन) अधिनियम, १९८० ची कोणतीही आडकाठी नाही, मात्र कलम-२२अ, अंतर्गत पुनःस्थापित क्षेत्राचे वापरात बदल, करावयाचा झाल्यास त्यासाठी केंद्र शासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल ही बाब विचारात घेवून, शासन परिपत्रक दि.०८.१२.२०१७ अन्वये खरेदी विक्री करीता काही अटींच्या अधिन राहून परवानगी दिली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील अंदुरा भाग-१, अंदुरा भाग-२ (ता.बाळापूर) व अडसुळ (ता.तेल्हारा) येथील नदी पात्रात अवैधरीत्या खोदकाम केल्याबाबत

**(२६) * १२१४७७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील अंदुरा भाग-१, अंदुरा भाग-२ (ता.बाळापूर) व अडसुळ (ता.तेल्हारा) येथील नदीच्या पात्रात कंत्राटदारामार्फत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने नियमबाहयरित्या ३ फुटापेक्षा जास्त खोदकाम करून शासनाची आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व वन विभागाच्या दिनांक २५ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार नदीपात्रात ३ फुटापेक्षा जास्त खोदकाम करणाऱ्या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याची तरतूद असतानाही संबंधित कंत्राटदारावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर ठिकाणच्या नदीपात्रात ३ फुटापेक्षा जास्त खोदकाम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अकोला जिल्ह्यामध्ये बाळापूर तालुक्यातील अंदुरा भाग-१, अंदुरा भाग-२ व तेल्हारा तालुक्यातील अडसुळ हे वाळूगट सन २०१७-१८ मध्ये सर्वोच्च बोलीने लिलावात गेले आहेत. उक्त वाळूस्थळांतील खोदकामाबाबत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण अहवालानुसार नदीपात्रातील वाळूस्थळात ३ फुटापेक्षा जास्त खोदकाम झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेवलेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) या पुनर्वसित गावठाणाला नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * ११९८६२ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेवलेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथे सन २००४-२००५ च्या अतिवृष्टीमध्ये गावाच्या आसपासची जमिन खचल्यामुळे सन २००६ साली या गावाचे सुरक्षित ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनांतर्गत पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ साली या पुनर्वसित गावठाणामध्ये येथील ग्रामस्थांना नवीन घरांचे वाटपही करण्यात आले असुन या पुनर्वसित गावठाणामध्ये सध्या चेवलेवाडी ग्रामस्थ वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुनर्वसित गावठाणामध्ये शासनाकडून पुरविण्यात येणा-या मुलभुत नागरी सुविधांपैकी आर.आर.सी. गटार बांधकाम, अंतर्गत रस्ते खडीकरण व डांबरीकरण तसेच सामाजिक व धार्मिक कार्यासाठी आवश्यक समाजमंदिर अशा नागरी सुविधांची कामे अद्यापही झाली नसल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असुन या नागरी सुविधा पुरविण्याकरीता निधी मिळण्याबाबत ग्रामस्थांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन या पुनर्वसित गावठाणाला उर्वरित नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) चेवलेवाडी येथील ग्रामस्थांनी नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधी मिळण्याकरिता जिल्हाधिकारी, सातारा व तहसिलदार, पाटण यांच्या कार्यालयाकडे निवेदन दिले असल्याचे दिसून येत नाही. तथापि, चेवलेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) चा पूरग्रस्त पुनर्वसित गावठाणात पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, प्राथमिक शाळाच्या खोल्या बांधकाम, चावडी इमारत व पोहोच रस्ता ह्या नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेळवे-कौठाळी-शिरढोण-पंढरपुर (ता.पंढरपुर, जि.सोलापुर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) * १२१०१७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेळवे-कौठाळी-शिरढोण-पंढरपुर (ता.पंढरपुर, जि.सोलापुर) या रस्त्यावर अनेक खड्डे पडल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून गत अनेक वर्षापासून रस्ता नादुरुस्त असल्यामुळे रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावरून परिसरातील ९०० शाळकरी विद्यार्थी तसेच सामान्य नागरिक प्रवास करत असून या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघात घडून त्यांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक नागरिक व विद्यार्थ्यांनी मागणी केली असताना अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता शेळवे ते कौठाळी प्रजिमा १७० चा भाग आहे. द्वैवार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत रस्ता दुरुस्ती व अनुषांगिक कामे करण्यात आली आहेत.

कौठाळी शिरढोण पंढरपूर हा प्रजिमा १३३ चा भाग असून हायब्रिड ॲन्यूटी अंतर्गत रस्त्याची सुधारणा व रुंदिकरणाचे काम मंजूर आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण करुन लवकरच काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीस दोन्ही रस्ते सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नविन परवानाधारक वाहनांना ई-टोल कार्ड (FASTag) सक्तीचे केल्याबाबत

**(२९) * ११६८८९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी पासून नव्याने पासिंग होणाऱ्या वाहनांवर ई-टोल कार्ड (FASTag) सक्तीचे केले असुन राज्यातील अनेक टोलनाक्यांवर ई-टोल (FASTag) रीडिंग व्यवस्था अद्यापी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहनांना ई-टोल (FASTag) बंधनकारक करण्यात आले असताना टोलनाका चालकांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे वाहनधारकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार राज्यातील टोलनाक्यावर ई-टोल (FASTag) रीडिंग व्यवस्था तातडीने बसविण्याबाबत तसेच याची अंमलबजावणी न करणाऱ्या टोल नाक्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाच्या दि.०२.१०.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्रीय मोटार वाहन १९८८, नियम १३८ क अनुसार ई-टोल कार्ड (FastTag) सर्व वाहनांना अनिवार्य करण्यात आले आहे. तथापि, राज्य शासनाच्या पथकर नाक्यांवर अद्यापि FastTag ची सुविधा कार्यान्वित नाही. परंतु राज्यातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या काही टोल नाक्यांवर ई-टॅगची सुविधा उपलब्ध आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील पथकर स्थानकावर FASTag यंत्रणा चालू करण्यासाठी Indian Highways Management Company Limited व केंद्र सरकार, नवी दिल्ली यांच्या सोबत सामंजस्य कराराबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ झाल्याबाबत

**(३०) * ११८२७५ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने पालाशयुक्त खतांच्या अनुदानात कपात केल्यामुळे खत कंपन्यांनी रासायनिक खतांच्या किंमतीत ७ ते १२ टक्के वाढ केल्याने खतांचे दर ५० ते १३० रुपयांनी वाढले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खत कंपन्यांनी रासायनिक खतांच्या किंमतीत वाढ केल्याने शेतक-यांना कोट्यवधीचा भूर्दंड पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रासायनिक खतांच्या किंमतीत झालेली वाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१७-१८ च्या तुलनेत चालु वर्षी केंद्र शासनाने बहुतांश खतांच्या अनुदान दरात वाढ केलेली आहे. रासायनिक खतांची कमाल विक्री किंमत ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनाने उत्पादक/आयातदार कंपनीस दिलेले आहेत. सन २०१७-१८ च्या तुलनेत चालू वर्षातील रासायनिक खतांच्या कमाल विक्री किंमतीत रु. ३० ते रु. १२०/- इतकी वाढ झालेली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) रासायनिक खतांच्या किंमती नियंत्रित ठेवण्यासाठी केंद्र शासन प्रतिवर्षी मुलद्रव्य आधारित अनुदानाचे दर निश्चित करुन खत कंपन्यांना अनुदान देत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देगलूर, बिलोली आणि मुखेड (जि.नांदेड) या तालुक्यांतील रस्त्यांच्या कामास निधी मंजूर करण्याबाबत

**(३१) * १२२५६५ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर, बिलोली आणि मुखेड (जि.नांदेड) या तालुक्यांतील रस्त्यांच्या कामास निधी मंजूर करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, देगलूर-बिलोली यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार देगलूर, बिलोली आणि मुखेड या तालुक्यांतील रस्त्यांच्या कामासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन मागणीच्या अनुषंगाने देगलूर, बिलोली व मुखेड तालुक्यांतील एकूण २७ रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्यात आली असून सदर कामे निविदा व निधी उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे) येथील दस्त नोंदणी बंद असल्याबाबत

**(३२) * ११९३०९ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील २७ गावातील बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींची दस्त नोंदणी गत वर्षापासून बंद करण्यात आली असल्यामुळे शासनाचा ८१० कोटी रुपयांचा महसूल थकित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात सर्वपक्षीय हक्क सरंक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १९ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास अंबरनाथ तहसील कार्यालयासमोर आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच सदर इमारतींची दस्त नोंदणी बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीनुसार अंबरनाथ व कल्याण येथील इमारतींची दस्त नोंदणी पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.

कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील कुठल्याही प्रकारच्या दस्तांची नोंदणी बंद करण्याचे लेखी आदेश शासनाकडून देण्यात आलेले नाहीत. सह जिल्हा निबंधक ठाणे ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील अंबरनाथ तालुक्यातील सह दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर क्र.३ या नोंदणी कार्यालयात प्रश्नाधीन २७ गावांपैकी ८ गावांचे एकुण १५५४ दस्त वर्ष २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेले आहेत.

सह जिल्हा निबंधक ठाणे शहर यांचे कार्यक्षेत्रातील कल्याण तालुक्यातील सह दुय्यम निबंधक कल्याण क्र.१ ते ५ या नोंदणी कार्यालयात प्रश्नाधीन २७ गावांपैकी १९ गावांचे एकुण ७७३७ दस्त वर्ष २०१७-१८ मध्ये नोंदविण्यात आलेले आहेत.

या प्रमाणे वर्ष २०१७-१८ मध्ये अंबरनाथ व कल्याण तालुक्यातील २७ गावांत एकूण नोंदणी दस्तसंख्या ९२९१ असुन एकूण सुमारे रु.१९२.१६ कोटी इतका महसूल मुद्रांक शुल्क व नोंदणी फी पोटी जमा झाला आहे.

(२) सर्वपक्षीय हक्क संरक्षण समितीच्या पदाधिका-यांनी दि. १९ मे, २०१८ रोजी किंवा त्यासुमारास अंबरनाथ तहसिल कार्यालयासमोर आंदोलन केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ओवळा (भाईंदर पाडा) ते मालोडी (बंगला पाडा) (जि.ठाणे) यादरम्यान खाडीपूल बांधण्याबाबत

**(३३) * ११८३९५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल),**

**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, ठाणे व घोडबंदर (जि.ठाणे) परिसरात रोज होणाऱ्या वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी ओवळा (भाईंदर पाडा) ते मालोडी (बंगला पाडा) यादरम्यान खाडीपूल बांधण्याची मागणी लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१८ च्या दुस-या आठवड्यात तसेच तत्पुर्वी वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार ओवळा ते मालोडी यादरम्यान खाडीपूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर मागणीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरेवाडी ते नागलवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३४) * ११७२०१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरेवाडी ते नागलवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) या रस्त्याच्या कामात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यादेश व अंदाजपत्रकाप्रमाणे साहित्याचा वापर न करून निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाची चौकशी करण्याची मागणी संबंधित ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,
सुरेवानी ते नागलवाडी (ता.सावनेर, जि.नागपूर) या रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कोणतेही काम करण्यात आलेले नाही.
(२) हे खरे नाही,
संबंधीत ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कोणतीही तक्रार केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी-पश्चिम (मुंबई) येथील कोकीलाबेन धिरुभाई अंबानी रुग्णालयावर दंड आकारल्याबाबत

**(३५) * ११८१५५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी-पश्चिम (मुंबई) येथील कोकीलाबेन धिरुभाई अंबानी रुग्णालयाने शासनाने दिलेल्या जागेचा व्यापारी तत्वावर (गिफ्ट शॉप, स्पा, ब्युटी सलून,

फुड कोर्ट आणि रिलायन्स ग्रुपचे कार्यालय) वापर केल्याने सदर रुग्णालयावर शासनाने रुपये १७५ कोटीचा दंड आकारल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रुग्णालयाकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मालती वसंत हार्ट ट्रस्ट या संस्थेने विश्वस्तांमध्ये बदल करून रूग्णालयाच्या जमिनीचे शासनाच्या परवानगी शिवाय हस्तांतरण केल्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी अनर्जित उत्पन्नाची रक्कम रू.५७.८४ कोटी जमा करणेबाबत दिनांक ०२/१२/२०१४ रोजी आदेश पारित केले होते.

सदर, आदेशाविरूध्द मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांनी मा. मंत्री (महसूल) यांचेकडे पुनरीक्षण अर्ज सादर केला होता. सदर अर्जावरील सुनावणीअंती मा. मंत्री (महसूल) यांनी दि. १६/०५/२०१८ रोजी अंतीम आदेश पारित केले असून या प्रकरणी फेरचौकशी करून गुणवत्तेनुसार आदेश पारीत करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेंडूर, साळेल, कट्टा व कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील शेतकऱ्यांचे निकृष्ट दर्जाच्या कलिंगड रोपांमुळे झालेले नुकसान

**(३६) * १२०१०७ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंडूर, साळेल, कट्टा व कुंभारमाठ (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील शेतकऱ्यांनी पुणे येथील एका कंपनीने विक्री केलेल्या कलिगंड रोपांची लागवड केली असुन सदर रोपे निकृष्ट दर्जाची निघाल्याने उत्पादन घटुन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपनी विरोधात पंचायत समितीच्या तक्रार निवारण केंद्रात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कलिंगडाची निकृष्ट दर्जाची रोपे देणा-या कंपनीविरूध्द कारवाई करून शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी मा.कृषी राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) पेंडूर, साळेल व कट्टा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या गावातील ४ शेतकऱ्यांनी मे.नोन यु सिड्स प्रा.लि. या कंपनीची सरस्वती व विशाला या वाणांच्या कलिंगड रोपांची लागवड केलेली होती. कलिंगड पिकाचे अपेक्षित उत्पादन आलेले नसल्यामुळे त्यांनी तक्रार अर्ज कृषि अधिकारी, पंचायत समिती, मालवण यांच्याकडे केलेला होता. कुंभारमाठ, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील कोणत्याही शेतकऱ्याकडून तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही.

(३) होय.

(४) शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तालुका तक्रार निवारण समितीने शेतकऱ्यांच्या शेतावर जावून पहाणी केली. सदर पाहणीमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली. प्रत्यक्ष पंचनाम्याच्या वेळेस तक्रारदार शेतकऱ्यांकडे बियाणे खरेदीच्या पावत्या उपलब्ध नव्हत्या. सांगली जिल्ह्यात मे.नोन यु सिड्स प्रा.लि. या कंपनीच्या पपई या वाणाच्या बियाणांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे मे.नोन यु सिड्स प्रा.लि.

या कंपनीच्या बियाणांच्या विक्रीचा परवाना दिनांक १५.५.२०१८ रोजी निलंबित करण्यात आलेला आहे. तसेच, संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत ग्राहक मंचात तक्रार दाखल करण्यासाठी कृषि विभागाकडून सहकार्य करण्यात आलेले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

----------------

## दहिवेल (ता.साक्री, जि.धुळे) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहासाठी संपादित केलेल्या जमिनीचा निवाडा करण्याबाबत

**(३७) * ११७९६७ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिवेल (ता.साक्री, जि.धुळे) येथील शेतक-यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाच्या कामासाठी संपादित केलेल्या जमिनीचा तातडीने निवाडा करुन वाढीव मोबदला देण्यात यावा अन्यथा आत्मत्याग करु असा इशारा प्रशासनास दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी नुसार राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहासाठी संपादित केलेल्या जमिनीचा निवाडा तातडीने करुन शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

शेतकऱ्यांनी वाढीव मोबदल्यासाठी लवादाकडे दाखल केलेल्या अपिल प्रकरणी निर्णय झाला नसल्यामुळे संबंधित भुधारकांनी दि. १७.०४.२०१८ रोजी जिल्हाधिकारी, धुळे यांना निवेदन दिलेले आहे.

(२) होय.

(३) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ च्या कलम ३(G) ५ नुसार वाढीव मोबदल्याबाबत माहे एप्रिल, २०१८ अखेर पर्यंत साक्री व धुळे तालुक्यातील ४१ गावांमधील सुमारे १८३३ अपिल दावे लवाद तथा जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे दाखल असून त्यापैकी ७८० लवाद अपील दाव्यांचे निकालाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत प्रकरणांबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांनी बदलते हवामान, नापिकी व कर्जबाजारीपणामुळे केलेल्या आत्महत्या

**(३८) * ११६९३३ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बदलते हवामान, नापिकी व कर्जबाजारीपणामुळे गेल्या तीन महिन्यात २२१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभागात माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या तीन महिन्यांच्या कालावधीत १०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून नाशिक जिल्ह्यात माहे जानेवारी ते एप्रिल, २०१८ या काळात कर्ज व नापिकीला कंटाळून २८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असताना त्यापैकी ११ शेतकऱ्यांच्या कुटुंबांना मदतीच्या निकषात बसत नसल्याने शासकीय मदतीपासून वंचित रहावे लागल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्य शासनाने कर्जमाफी केल्यानंतरही बुलढाणा जिल्ह्यात ३०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये निदर्शनास आले असून मोताळा तालुक्यात १४ वर्षात १९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असताना या पैकी ७४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या शासनाने आर्थिक मदतीसाठी अपात्र ठरविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मानवत (जि.परभणी) तालुक्यातील मानोली या गावातील शेतकऱ्यांनी बोंड अळीच्या प्रादुर्भावाने उत्पादनात घट होऊन नुकसान झाल्याने आत्महत्येच्या केलेल्या प्रयत्नात तिघांचा मृत्यू झाला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राजूरवाडी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्याने बोंड अळीमुळे झालेल्या कापसाची नुकसान भरपाई व कर्जमाफी न मिळाल्यामुळे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनामार्फत शेतकऱ्यांना पाठबळ देण्याकरिता विविध योजना राबविण्यात येत असतानाही राज्यात आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने मदतीच्या निकषात बदल करून आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यात गेल्या तीन महिन्यात (१ मार्च, २०१८ ते ३१ मे, २०१८) एकूण ६३९ आत्महत्या आढळून आल्या. त्यापैकी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ मधील निकषान्वये १८८ आत्महत्यांची प्रकरणे पात्र ठरली असून १२२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तसेच ३२९ प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित आहेत. पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(२) नाशिक विभागात जानेवारी, २०१८ ते मार्च, २०१८ या कालावधीत एकूण १०१ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ४८ प्रकरणे पात्र तर ४१ प्रकरणे अपात्र असून १२ प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित आहेत. तसेच नाशिक जिल्हयात माहे जानेवारी ते एप्रिल, २०१८ या कालावधीत एकूण २९ आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ११ प्रकरणे पात्र तर १८ प्रकरणे दिनांक २३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयातील नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या निकषात बसत नसल्याने अपात्र ठरविण्यात आल्या आहेत.

(३) बुलढाणा जिल्हयात जुलै, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत एकूण २४० शेतकरी आत्महत्या निदर्शनास आलेल्या असून मोताळा तालुक्यामध्ये सन २००४ ते २०१७ या कालावधीत १८२ शेतकरी आत्महत्या झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी ११४ शेतकरी आत्महत्याची प्रकरणे शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ मधील निकषात बसत नसल्यामुळे अपात्र ठरविण्यात आली आहेत.

(४) हे खरे नाही.

मृतक शंकर भाऊराव चायरे, रा.राजूरवाडी, ता.घाटंजी यांचे नांवे रु.९९,४३०/- एवढे कर्ज थकीत असून कर्जमाफीस पात्र ठरत नसल्याने कर्जमाफीचा लाभ देण्यात आलेला नाही. मात्र सदर प्रकरण जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र ठरल्यामुळे वारसांना रु.१.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.

मानवत (जि.परभणी) येथील ३ व्यक्तींनी मार्च २०१८ मध्ये आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असून त्यांच्या कुंटुबियांना रूपये १ लक्ष मदत वाटप करण्यात आली आहे. शासनाकडून शेतकऱ्यांना बोंडअळीमुळे झालेल्या कापसाच्या नुकसानीसाठी मदत वाटप करण्यात येत आहे.

(५) राज्यात आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होण्याची कारणे अनेक आहेत. मात्र नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे झालेल्या आत्महत्याप्रकरणी रु.१.०० लक्ष चे सानुग्रह अनुदान आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या वारसांना देण्यात येते.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी अन्न सुरक्षा योजना, महात्मा फुले जीवनदायी योजना तसेच प्रेरणा प्रकल्प सेवा अंतर्गत आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

(६) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या निकषात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील घोड व भीमा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(३९) * १२०४१० श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोड व भीमा (ता.शिरुर, जि.पुणे) या नद्यांच्या पात्रातील वाळू उपशाचे लिलाव झाले नसताना माहे मार्च, २०१८ पासून शिरूर तालुक्यातील या नद्यांच्या पात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे नदीपात्रात सात ते आठ फुटांपेक्षा जास्त खोलीचे खड्डे पडले असून या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या महसूलाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशाबाबत स्थानिक ग्रामस्थ व ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनसुध्दा या वाळू माफियांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शिरूर तालुक्यातील घोड व भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर व अवैध वाळू उपशाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) शिरुर तालुक्यातील घोड व भीमा नदीपात्रातून रेतीचे अवैध उत्खनन होत असल्याची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(३) व (४) माहे मार्च,२०१८ ते मे,२०१८ या कालावधीत शिरुर तालुक्यामध्ये घोड व भीमा नदीपात्रातून अनधिकृत वाळू उत्खनन झालेल्या ८ प्रकरणांमध्ये रु.१,०७,१८,८००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तसेच २३ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

शिरुर तालुक्यात सन २०१७-१८ या कालावधीमध्ये गौण खनिजाचे अनधिकृत उत्खननाच्या ३२ प्रकरणांमध्ये रु.१६,४४,५८,२००/- इतक्या रक्कमेचे दंडात्मक आदेश पारित करण्यात आलेले आहेत. तर गौण खनिजाची अनधिकृत वाहतूक करणाऱ्या १२५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.९५,११,५६०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाणार प्रकल्प (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) व आजूबाजूच्या परिसरात जमिनींच्या खरेदी विक्रीचे झालेले व्यवहार रद्द करण्याबाबत

**(४०) * ११९७१८ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या आजूबाजूच्या परिसरातील ५३९ एकर जमिनींची गत आठ महिन्यात विक्री झाली असून शेतक-यांच्या जमिनी व्यापा-यांनी खरेदी केल्यामुळे त्याचा लाभ व्यापाऱ्यांनाच मिळणार असून त्यांनीच नाणार प्रकल्पासाठी समंत्तीपत्रके दिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाणार प्रकल्पास विरोध असणा-या आंदोलकांनी गत आठ महिन्यात झालेल्या जमिनींच्या खरेदी विक्रीचे संपूर्ण व्यवहार रद्द करण्याची मागणी केली असल्याचेही दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार गत आठ महिन्यात उक्त प्रकल्प व आजूबाजूच्या परिसरात झालेले खरेदी विक्रीचे व्यवहार रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) नाणार प्रकल्पा करिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मौजे-कारशिंगेवाडी, सागवे, विल्ये, दत्तवाडी, पालेकरवाडी, कात्रादेवी, कारिवणे, चौक, नाणार, उपळे, पडवे,

साखर, तारळ आणि गोठविरे येथील एकूण ५४६१.४७ हे.आर जमीन संपादनाखाली प्रस्तावित असून याबाबतची अधिसूचना दिनांक १८.०५.२०१७ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचना प्रसिध्द होण्यापूर्वी व तद्नंतर उक्त भागात अनेक जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. असे खरेदी-विक्रीचे व्यवहार रद्द करण्याची मागणीही प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्प ज्या परिसरात प्रस्तावित आहे त्या परिसरातील जमीन खरेदी व्यवहारामध्ये कोणत्याही प्रचलित कायद्याचा भंग झाला आहे किंवा कसे याबाबतची शहानिशा करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविले असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## विदर्भ आणि खानदेशातील आठ तालुक्यात दुष्काळ जाहिर केल्याबाबत

**(४१) * ११७४४७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळसह राळेगाव, दिग्रस, घाटंजी व केळापूर, वाशिम जिल्ह्यातील वाशिम व खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर व बोदवड या आठ तालुक्यात माहे जून ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीतील कमी पाऊस, भूजल पातळीतील घट, पेरणी खालील क्षेत्र आणि पिकांची उपलब्धता या गोष्टीचा विचार करुन दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास दुष्काळ जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्याच्या काही तालुक्यांमध्ये अशीच परिस्थिती असताना त्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून इतर दुष्काळी तालुक्यांमध्येही तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मराठवाडयातील राज्यातील इतर दुष्काळग्रसत तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) दुष्काळ व्यवस्थापन संहितेमध्ये विहित केलेल्या निकषांचा विचार करून या निकषांनुसार राळेगांव, दिग्रस, घाटंजी, केळापूर व यवतमाळ, वाशिम, मुक्ताईनगर व बोदवड या तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ महसुल व वन विभाग दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील इतर तालुके या निकषात बसत नसल्याने तेथे दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलीबाग व उरण (जि.रायगड) तालुक्यातील मच्छिमार संस्थाना वाटप केलेल्या कर्जात झालेला गैरव्यवहार

**(४२) * ११९८७० श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व उरण (जि.रायगड) तालुक्यातील दर्यासागर व त्रिशाला मच्छिमार संस्थांना केलेल्या लाखो रूपयांच्या कर्ज पुरवठयात मोठया प्रमाणात अपहार झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्रिशला मच्छिमार संस्थेतील ज्या चेअरमनच्या नावे २९ लाख रूपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे तो चेअरमन सौदी अरेबियात नोकरी करित असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच दर्यासागार संस्थेमधील ६० लाख असा एकूण ९० लाख रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधित विभागाचे अधिकारी तसेच मच्छिमार संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३) दर्यासागर मच्छिमार संस्थेचे चेअरमन श्री पवन भालचंद्र नाखवा यांनी संस्थेला अदा करण्यात आलेल्या रकमांची अफरातफर केल्यामुळे त्यांच्याविरोधात दि. २८.०४.२०१८ रोजी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा (एफआयआर नं ००८६) दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे. त्रिशाला मच्छिमार संस्थेला अदा करण्यात आलेल्या रक्कमेची परतफेड न केल्यामुळे संस्थेविरुद्ध सक्तीच्या मार्गाने भागभांडवल वसुलीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुणगे-विराचापार (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत

**(४३) * ११६६०९ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुणगे-विराचापार (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी प्लॉन २०१६/सीआर- ५८४/प्लॉन-३ अन्वये दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्याच्या रुपये २ कोटीच्या अंदाजे खर्चास मंजुरी देवून यासाठी सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात रुपये ४३ लाख ४८ हजाराची तरतुद केली असतानाही सदर बंधाऱ्याच्या कामास सुरुवात झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त बंधाऱ्याच्या बांधकामास सुरुवात करुन तातडीने काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुणगे-विराचापार (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी शासन निर्णय क्र.पिएलएन २०१६/सीआर-(५७४)/नि-३, दि.१६.२.२०१६ अन्वये शासनाने मंजुरी दिली आहे.

(२) होय, हे खरे आहे. सदर कामाला रु.२.०० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली असून सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.४३.४८लक्ष, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.३४.४२लक्ष एवढी तरतुद करण्यात आली होती व सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रु.७.६१लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि, महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून किनारपट्टी क्षेत्र अधिनियम २०११ नुसार CRZ मंजूरी अप्राप्त असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंजणी रेल्वे स्टेशन (ता.खेड, जि.रत्नागिरी) ते खाडीपट्टयातील गावांमधील खाडीवर पूल उभारण्याबाबत

**(४४) * ११६९८३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळजे, बहिरवली, रजवेल, मुंबके, शिर्षी, तुंबाड, कोरगांव, होडखाड, कर्जी, अनसपुरे, सवणस (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावांसह आजुबाजुची गांवे व आंजणी रेल्वे स्टेशन या दरम्यानच्या खाडीवर पूल नसल्यामुळे उक्त गावातील नागरीकांना आंजणी रेल्वे स्टेशनला पोहोचण्यासाठी ६० किलोमीटरचा वळसा घेऊन जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंजणी रेल्वे स्टेशन आणि खाडीपट्टयातील गावे यामधील खाडीवर पूल बांधल्यास या गावातील नागरीकांचे सुमारे ५० किलोमीटरचे अंतर वाचून त्यांच्या वेळ व खर्चामध्ये बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर गांवे व आंजणी रेल्वे स्टेशन या दरम्यानच्या खाडीवर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) मागणीकृत पुलाचे व जोडरस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या नाशिक येथील विभागीय कार्यालयात झालेला गैरव्यवहार

**(४५) * ११९३९४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या नाशिक येथील विभागीय कार्यालयात सुमारे १.५० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार सन २०१२ ते माहे जानेवारी, २०१७ या कालावधीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ ते दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये महामंडळाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नावे रु.२३.७१ लाख भरणा करून महामंडळाच्या खात्यावर जमा केले असून दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी उप विभागीय कार्यालय, अहमदनगर येथील तीन अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध रु.६६.०३ लाख इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार दाखल झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.भागवत लांबे यांच्या कार्यकाळामध्ये नाशिक विभागीय कार्यालयाची येणे बाकी रक्कम १५.०० कोटी रुपये असून पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडील साठा फक्त १.५० कोटी रुपयांचा असताना उर्वरित सुमारे १३.५० कोटी रुपयांचा अपहार श्री.बोरसे यांच्या संगनमताने श्री.लांबे यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयातंर्गतच्या अहमदनगर उपविभागीय कार्यालयात रुपये १.२० कोटी रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झालेला आहे, हे खरे आहे.
(२) होय, सदर प्रकरणातील अपहारी अधिकाऱ्यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ ते १३ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये एकूण रु. २३.७१ लाखाचा भरणा महामंडळाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था खात्यावर वेगवेगळया शेतकरी बचत गट व वैयक्तिक शेतकऱ्यांकडून अवैधरीतीने रोखीने रक्कम घेऊन जमा केली असल्याचे दिसून आलेले आहे.

तसेच, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ रोजी उपविभागीय कार्यालय, अहमदनगर येथील ३ अधिकारी/ कर्मचारी श्री. आर. बी. होले, सहा. व्यवस्थापक (पणन), श्री. एम.एम. राजूरकर, सहा. व्यवस्थापक (पशुखाद्य) व श्री. आर. बी. कुलट, लिपीक यांच्याविरुध्द रु. ६६.०४ लाख इतक्या रकमेचा अपहार केल्याचा गुन्हा नों.क्र. ५१०/२०१७ अन्वये कोतवाली पोलिस

ठाणे, अहमदनगर येथे दाखल करण्यात आलेला आहे. सदरच्या मुळ तक्रारीतच रु. ५४.९५ लाखाची पुरवणी तक्रार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी समाविष्ट करुन, सदर तक्रार ही एकूण रु. १२०.९९ कोटी इतक्या आर्थिक गैरव्यवहाराची आहे.

(३) विभागीय कार्यालय नाशिकच्या कृषि अभियांत्रिकी विभागाची दिनांक २८/०२/२०१८ रोजीची येणेबाकी रु.१५ कोटी नसून प्रत्यक्षात रु.८.५६ कोटी झाली आहे. नाशिक व अहमदनगर जिल्हयातील पंचायत समित्या व तालुका कृषि अधिकारी कार्यालये यांच्याकडे एकूण रु.१.५९ कोटी रुपयांची अवजारे साठयात शिल्लक आहेत. तसेच, रु.८.५६ कोटी येणे बाकी आहे. रु.८.५६ कोटीच्या वसुलीकरीता कृषि अधिकारी, पंचायत समिती या विभागाकडे महामंडळामार्फत पाठपुरावा सुरु आहे.

(४) सदर प्रकरणाचे गांभीर्य व व्याप्ती विचारात घेवून आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पूणे यांना प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ०७ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिनांक ०६/१२/२०१७ रोजी निलंबित करण्यात आलेले असून त्यांची विभागीय चौकशी चालू आहे. फौजदारी गुन्हयाची चौकशी सुध्दा चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भातसा (ता.शहापूर, जि.ठाणे) नदीपात्रात अवैधरित्या वाळू उपसा केल्याबाबत

**(४६) * ११८४२५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातसा (ता.शहापूर, जि.ठाणे) नदीपात्रात अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैधरीत्या वाळू उपसा केला जात असल्यामुळे नदीचे पात्र अरुंद होत असून नदीचा काठ धसत असल्याचे तसेच नदी पात्रातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे नागरीकांनी याबाबत तहसीलदार, शहापूर यांचेकडे दिनांक १० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास वारंवार तक्रारी केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपसामुळे शासनाच्या महसुलाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून पर्यावरणालाही धोका पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त नदी पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) भातसा नदीपात्रातून अवैध रेती उपसा होत असल्याबाबत ग्रामस्थ मंडळ, पाषाणे, ता.शहापूर यांचा दि.५/१/२०१८ रोजीचा तक्रार अर्ज तहसीलदार, शहापूर यांचेकडे प्राप्त झाला आहे. तसेच दि.११/५/२०१८ रोजी एका वृत्तपत्रात "भातसा नदीपात्रात वाळुमाफियांचा हैदोस, आदिवासींवर दबावतंत्राचा वापर" या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी संबंधित मंडळ अधिकारी, तलाठी व स्थानिक पंच यांचेसमक्ष स्थळपाहणी केली असता भातसा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील कोलंबिका देवी देवस्थानच्या जमीनीचे बेकायदा हस्तांतरण करण्यात आल्याबाबत

**(४७) * ११७२०६ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे सन २००७ ते २०१४ या कालावधीत कोलंबिका देवी देवस्थानच्या मालकीच्या वर्ग तीन मध्ये मोडत असलेल्या व

शासनाच्या परवानगी शिवाय हस्तांतर करता न येणाऱ्या रुपये २०० कोटी किमतीच्या १८४ एकर जमीनीचे महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संगनमत करून बेकायदा हस्तांतरण करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेकायदा व्यवहार प्रकरणी विश्वस्त व अन्य व्यक्तिंबरोबर एक तलाठी व मंडळ अधिकारी, दोन तहसिलदार यांच्या विरोधात शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा नायब तहसिलदार सुरेश निरगुडे यांनी त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी गुन्हा दाखल होऊनही अद्यापी कोणतीच कारवाई करण्यात आली नाही आहे तसेच सदर प्रकरण निदर्शनास आणणारे विभागीय आयुक्त यांची बदली करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी गुन्हा दाखल होऊनही कोणतीही कारवाई न करण्याची तसेच संबंधित विभागीय आयुक्तांची बदली करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर तातडीने कारवाई करण्याबाबत तसेच जमीन देवस्थानला परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. मौजे त्र्यंबकेश्वर येथील गट नं.३०१, ३२१, ३२७, ३२२/२, ३२३, ३२५, ३२८, ३२४, ३५८, ३०० व ३२६ या देवस्थान इनाम वर्ग-३ च्या मिळकती कोलंबिका देवी व गंगाव्दार ट्रस्ट यांच्या नावे होत्या. सदर मिळकती ट्रस्ट कडुन सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांनी सन २००७ मध्ये शासन व धर्मादाय आयुक्त यांच्या परवानगीशिवाय वेगवेगळ्या नोंदणीकृत भाडेपट्टयाने अकृषिक प्रयोजनार्थ वहितीस घेतल्या. तदनंतर सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांनी तत्कालीन तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, त्र्यंबकेश्वर यांचेकडे कुळ कायदा कलम ३२-ओ प्रमाणे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी

प्रकरणी दावे चालवून सदर जमीनीची किंमत ठरवुन जमीन खरेदी करणेबाबतचे आदेश पारित करुन कलम ३२ एम खालील प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर आदेशांस अनुसरुन उक्त देवस्थान जमीनींचा खरेदीचा व्यवहार नोंदणीकृत करण्यात आला असून जमिनी सौ.संध्या सचिन दप्तरी व इतर यांना अदा केलेल्या आहेत.

(२) देवस्थानाच्या जमीनीच्या हस्तांतरणास प्रत्यवाय असतांना शासकीय दस्तावेज तयार करुन पदाचा गैरवापर केल्याच्या अनुषंगाने तत्कालिन तहसिलदार त्र्यंबकेश्वर, संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी आणि इतर यांच्याविरुध्द त्रंबकेश्वर पोलीस ठाणे येथे दि.२५/२/२०१८ रोजी एफ.आय.आर. नोंदविण्यात आलेला आहे.

(३) व (४) त्रंबकेश्वर पोलीस ठाणे येथे दिनांक २५/२/२०१८ रोजी नोंदविण्यात आलेल्या एफ.आय.आर.च्या अनुषंगाने पोलिसांमार्फत गुन्हयाचा तपास सुरु आहे.

प्रधान सचिव (प्र.सु. व र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय हे रिक्त पद प्रशासकीय निकडीस्तव भरणे आवश्यक असल्यामुळे दिनांक २८/२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये तत्कालिन विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांची प्रधान सचिव (प्र.सु. व र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय या पदावर बदली करण्यात आलेली होती.

(५) सदर प्रकरणी लोकसेवक असलेले तत्कालिन संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी व दोन तहसिलदार यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच तत्कालिन तहसिलदार, त्र्यंबकेश्वर यांनी पारित केलेल्या कुळ कायद्याखालील आदेशांच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, त्र्यंबकेश्वर यांच्या स्तरावर स्वाधिकारे पुनरीक्षणाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेले नुकसान

**(४८) * ११७०६४ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.भारती लव्हेकर**

**(वर्सोवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयात कोकण विभागासह पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, बीड, लातूर, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर व विदर्भातील अनेक जिल्हयात वादळीवाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे गहू, हरभरा, कांदा, मका, उडीद, कपाशी, टॉमेटो, वांगी, काकडी, भाजीपाला, आंबा, काजू, केळी, कलिंगड, डाळिंब, सिताफळ व द्राक्ष फळबागा पिकांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे घरे, विजेचे खांब, शाळा व समाज मंदिरांची पडझड होऊन नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या शेळयामेंढया, बैल व कोंबडया इत्यादी पशुधनाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे शासनाने केले आहेत काय,

(४) असल्यास, त्यानुसार पिकांचे व फळबागांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह पशुधनाचे नुकसान झालेल्या पशुपालक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाने दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या पत्रान्वये पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

(४) पिकांचे व फळबागांच्या नुकसानीबाबतचे अहवाल प्राप्त होताच अर्थसहाय्य देण्याबाबतची कार्यवाही शासनाकडून करण्यात येईल. सांगली जिल्हयातील ६ मेंढ्या, २ शेळ्या व १ बोकड मृत झाले असून पशुपालक शेतकऱ्यांना दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार रु. २५ हजार इतकी मदत देण्यात आली आहे. तसेच, सोलापूर जिल्हयातील ३४ लहान / मोठी जनावरे मृत झाली असून पशुपालक शेतकऱ्यांना रु. ५ लाख २७ हजार इतकी मदत देण्यात आली आहे. औरंगाबाद विभागात २७० कोंबड्या, २७ लहान जनावरे, ११७ मोठी जनावरे मृत झाली असून पशुपालक शेतकऱ्यांना दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयानुसार मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच इतर विभागात पंचनामे करण्यात आले असून आर्थिक मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.